महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

Email ID : spchandrapur@mahapolice.gov.in Phone No.07172-255100/273258, Fax No.07172-255800

क्रमांक :-पोअचं/एसबी-१/पदोन्नती - पोहवा/२०२५- 1536 चंद्रपूर दिनांक 06 /०५/२०२५

## -: आदेश :-

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन यांचेकडील परिपत्रक क्रमांक – सीबीसी -२०१८/प्र.क्र. ३३६/१६- ब, दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती यांचीका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून खालील नमुद पोलीस अंमलदार हे पदोन्नतीकरीता आवश्यक अटी व शर्ती पुर्ण करीत असल्याने त्यांना आदेश निर्गमीत केल्याच्या दिनांकापासून वेतनश्रेणी वेतन स्तर एस-०९ : रुपये २६४००-८३६००/- मध्ये पोलीस हवालदार (पोहवा) पदात तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पो.कर्म. नांव, हुद्दा व ब.नं. | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | पोशि/२५५४, गजानन मडावी | पोलीस स्टेशन नाभिड |
| २ | पोशि/२५४५, संगपाल गेडाम | पोलीस स्टेशन राजुरा |
| ३ | पोशि/२५४८, राकेश तुराणकर | पोलीस स्टेशन शेगांव |
| ४ | पोशि/२५०८, विशाल हुड | पोलीस स्टेशन घुग्गुस |
| ५ | पोशि/२५५०, अनिल काळबांधे | पोलीस स्टेशन रामनगर |

१. भाग – १ मधील नमुद पोलीस हवालदार यांना दिलेली पदोन्नतीची पदस्थापना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक - सीबीसी -२०१८/प्र.क्र. ३३६/१६- ब, दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती यांचीका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वड तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार सदरहू आदेशात बदल होवू शकतो.

२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक – पीवाय/१०८२/सीआर-११००(ए) एसईआर-३, दिनांक ०६/११/१९८४ अन्वये वरील नमुद पोलीस हवालदार यांना वेतन निश्चिती संबंधाने विकल्प भरून दयावयाचा असल्यास त्यांनी एक महिण्याचे आत विहीत मुदतीत विकल्प भरून कार्यालयास सादर करावा. पदोन्नती स्विकारल्यापासून एक महिण्याचे आत विकल्प प्राप्त न झाल्यास पदोन्नती पदावरील वेतन निश्चिती म.ना.से. (वेतन) नियम ११ (१) (अ) अन्वये कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

३. मागासवर्गीय पोलीस हवालदार यांची जात वैधता सादर केली असल्याचे अधिन राहून पदोन्नती देण्यात आलेली आहे. जात वैधता नसल्याचे निष्पन्न झाल्यास पुर्वीच्या पदावर पदावनत करण्यात येईल.

४. कर्मचारी अनाधिकृतपणे गैरहजर तसेच सिक रजेवर असतील तर ते ज्या तारखेला कर्तव्यार्थ रूजू होतील तेव्हापासून त्यांचा पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक ग्राहय धरण्यात येईल याबाबत अनुपालन अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा.

५. पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना निलंबित केले असेल किंवा त्यांचे विरूध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा न्यायालयीन खटला सुरू असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरूध्द न्यायालयात अपील

प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा या वित्तीय वर्षात संपुष्टात येत नसेल तर त्यांना पदावनत करण्यात येईल.

६. पदोन्नत झालेल्या पोलीस अंमलदार यांची पदस्थापना नेमणुकीस असलेल्या पोलीस स्टेशनलाच राहील.

७. पदोन्नत झालेल्या सर्व पोलीस अंमलदार यांचे हार्दीक अभिनंदन.

सदर पदोन्नती आदेश चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाच्या www.chandrapurpolice.gov.in या संकेतस्थळावर फ्लॅश या शिर्षाखाली उपलब्ध आहेत.

( मुम्मका सुदर्शन, भापोसे )
पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

प्रति,

वरील सर्व संबंधीतास,

मार्फत व प्रतिलिपी :- प्रभारी अधिकारी, सर्व पो. स्टे. चंद्रपूर जिल्हा / सर्व शाखा प्रमुख /रापोनि पो.मु. चंद्रपूर

प्रतिलिपी :- सर्व पोलीस उप विभागीय अधिकारी, चंद्रपूर जिल्हा यांना माहितीस.

प्रतिलिपी :- पोलीस उप अधीक्षक (मुख्या), चंद्रपूर यांना माहितीस.

प्रतिलिपी :- सहा. पगार लिपीक- ३, ४, ५, १४/ राजपत्र लिपीक/सआली ३, ४, ५, ६, ७ व ८ यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस.